दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक




vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.६ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 6 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 22 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मुख्यमंत्र्यांच्या विदर्भात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचा सरकारवर हल्लाबोल

## सरकार त्या शेतकऱ्यांना विसरले; राज्यात दररोज २० शेतकऱ्यांच्या आत्महत्या





**भंडारा (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीदरम्यान शेतकजयांचा सातबारा कोरा करण्याची घोषणा केली होती. त्यांनी ते आश्वासन पूर्ण करावे. मुख्यमंत्री विदर्भाचे असताना या भागात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होतात. भंडारा-गोंदिया जिल्ह्यापासून केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्र्यांची निवासस्थाने अवघ्या १०० किमी अंतरावर आहेत, तरीही धान उत्पादकांसाठी कोणतेही विशेष धोरण नाही. धार्मिक संघर्षात अडकवून सरकार शेतकरी, मजूर, अपंग, मच्छीमार आणि प्रकल्पग्रस्तांच्या मूलभूत समस्यांपासून लक्ष विचलित करत आहे, अशी टीका माजी राज्यमंत्री तथा प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांनी सरकारवर केली.

शेतकरी, मजूर, अपंग, मच्छीमार आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी काढण्यात आलेल्या न्याय हक्क यात्रेदरम्यान गुरुवार, ४ सप्टेंबर रोजी भंडारा येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. कडू म्हणाले की, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन निवडणूक जिंकली. आता सरकार त्या शेतकऱ्यांना विसरले. सत्ताधाऱ्यांना त्यांच्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी ही न्याय हक्क यात्रा काढण्यात आल्याचे कडू म्हणाले.शेतकऱ्यांना कर्जमाफीसह त्यांच्या उत्पादनांना हमीभाव मिळावा या प्रमुख मागणीसाठी गेल्या ६ महिन्यांत विविध आंदोलने करण्यात आली आहेत. एवढे सर्व असूनही, कर्जमाफीबाबत सरकार कोणतेही ठोस पाऊल उचलत नाही, असेही बच्चू कडू यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत प्रहार जनशक्ती पक्षाचे भंडारा गोंदिया संपर्क प्रमुख संजय देशमुख, रमेश कारेमोरे, प्रहारचे जिल्हाध्यक्ष अंकुश वंजारी उपस्थित होते.

राज्यात दररोज सरासरी २० शेतकरी आत्महत्या होतात. सरकारकडे अदानी, अंबानींचे १२ लाख कोटी रुपये माफ करण्यासाठी पैसे आहेत पण शेतकजयांसाठी नाहीत. विदर्भात कापूस, सोयाबीन आणि धान उत्पादक शेतकजयांची संख्या मोठी आहे. त्यामुळे सरकारने धान उत्पादक शेतकजयांना प्रति क्विंटल किमान ५ हजार रुपये हमीभाव द्यावा. शेतकजयांच्या उत्पादनांवर होणाजया नफ्यात शेतकऱ्यांना भागीदार बनवण्यासाठी सरकारने धोरण तयार करावे. 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा देऊन जिंकलेल्या भाजप सरकारच्या काळात कर्जाच्या ओझ्याखाली मरणारा शेतकरी हिंदू नाही का? असा प्रश्न बच्चू कडू यांनी सरकारला विचारला. येत्या काळात शेतकजयांसाठी विशेष धोरण आणि कर्जमाफी साठी ठोस पावले उचलण्यासाठी २८ ऑक्टोबर रोजी मोठे जनआंदोलन होणार आहे, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

## प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेकडून रामप्रसाद चन्नावार यांना श्रद्धांजली



**नायगांव । हनुमंत चंदनकर**

नायगांव शहरातील समिक एकजुटचे कै रामप्रसाद विठ्ठलराव चन्नावार यांच्या निवासस्थानी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनांच्या वतीने प्रहार जनशक्तीपक्ष च्या वतीने सांत्वन करण्यात आला या वेळेस प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नादेड जिल्हा दक्षिण अध्यक्ष श्री श्रीराम पा पवार प्रहार जनशक्तीपक्ष नादेड जिल्हा संपर्क प्रमुख श्री गणेश पा हाडे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नादेड जिल्हा कार्याध्यक्ष श्री गोपीनाथ मुंडे सागविकर प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नादेड जिल्हा सचिव श्री मारोती मगरुळे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नादेड जिल्हा संपर्क प्रमुख श्री राजेश पा, बेळगे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नादेड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख श्री चादु आंबटवाड प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नायगाव तालुका अध्यक्ष श्री साईनाथ बोईनवाड प्रहार दिव्यांग क्रांती संघटना नायगाव तालुका उपाध्यक्ष श्री माधव कोसबे समाज सेवक श्री बालाजी रानवळकर कैलास ताटे पत्रकार श्री हानमत चदनकर लक्ष्मण विठ्ठलराव चेनावार साईनाथ व्यंकटराव चेनावार अंकुश रामप्रसाद चेनावार साईप्रसाद रामप्रसाद चेनावार परीवार व प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व जन शक्ती पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

## केज पोलिसांची डीजेवर कारवाई



**केज । गौतम बचुटे**

केज पोलिसांनी एका डीजेवर कारवाई केली आहे.या बाबतची माहिती अशी की, केज येथून एक डिजेची गाडी जात असताना पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम आणि वाहतूक शाखेचे नितीन जाधव यांनी कारवाई करून हद्दीत डी जे न वाजविण्या बाबत समज दिली. तसेच नियमांचे उल्लंघन झाल्यास मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशा प्रमाणे कठोर कार्यवाई करण्याची देखील तंबी दिली आहे. केज पोलिसांच्या डी जे विरुद्धच्या कारवाईमुळे डीजे चालक धास्तावले असून सार्वजनिक सण उत्सव साजरे करताना डीजे मुक्त आणि ध्वनी प्रदूषणमुक्त अशा वातावरणात व पारंपरिक वाड्यांच्या साथीने साजरे करण्याचे आवाहन केले आहे.

## कोल्हेवाडी ग्रा.पं.चा गौरव संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग



**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२४-२५ साठी कोल्हेवाडी ग्रामपंचायतीची निवड झाल्यानंतर,जिल्हा स्तरीय पथकाने दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी गावातील स्वच्छतेची पाहणी केली.यावेळी गावात झालेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला तसेच ग्रामपंचायतीला स्वच्छतेबाबत काही महत्त्वाच्या सूचना ही देण्यात आल्या.


ग्रामपंचायतीच्या गेल्या दीड वर्षातील विकास कामांचा आणि अभियानातील सहभागाचा गौरव करण्यासाठी,केज पंचायत समिती येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळेत कोल्हेवाडी ग्रामपंचायत चे सरपंच,उपसरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांचा केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हा सन्मान कोल्हेवाडी करांसाठी अभिमानाची बाब असून,तालुका व जिल्हास्तरावर पहिला किंवा दुसरा क्रमांक मिळविण्याच्या दिशेने ग्रामस्थांनी अधिक उत्साहाने सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले. ग्रामपंचायत,सरपंच, उपसरपंच,सदस्यांच्या वतीने सर्व ग्रामस्थांना स्वच्छता अभियानात श्रमदानातून योगदान देण्याचे,आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे तसेच गाव आदर्श, समृद्ध,स्वच्छ व निरोगी बनविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## केजमध्ये अचानक पोलिसांनी फोडले हॅन्डग्रेनेड आणि अश्रुधुराचे नळकांडे

**केज । गौतम बचुटे**

केज येथे अचानक पोलिस आणि दंगल नियंत्रक पथकाने कारवाई करीत अश्रुधुराचे नळकांडे फोडून हॅन्डग्रेनेड देखील फोडले. त्यामुळे नागरिकांत चर्चेला उधाण आले. या बाबतची माहिती अशी की, सध्या गणेशाचे विसर्जन आणि ईद ए मिलाद दुन्नाबीचा कार्यक्रम सुरू आहे. त्या निमित्त पोलिसांचा तगडा बंदोबस्त शहरात दाखल झाला असून दंगल नियंत्रण पथक आणि त्यांच्या मदतीला गृहरक्षक दल देखील तत्पर आहे.दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६:३० वा. च्या सुमारास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी आदेश देताच एका मागोमाग पोलिस दंगल नियंत्रण पथक आणि गृह रक्षक दलांच्या जवान त्यांच्या वाहनातून सायरन वाजवीत बीड रोडने शारदा इंग्लिश स्कूलच्या दिशेने रवाना झाले. शारदा इंग्लिश स्कूल जवळ जाताच सर्व पोलिसांनी पटापट गाडीतून उड्या मारल्या आणि त्यांची धावपळ करीत क्शन घेत पोझिशन घेतली. तेवढ्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना परिस्थितीचे ब्रिफिंग केले आणि पोलिस निरीक्षकांनी आदेश देताच दंगल नियंत्रण पथकाचे जवान यांनी हॅन्डग्रेड व अश्रुधुराचे नळकांडे काढून त्याचे हवेत फायर करायला सुरुवात केली.



> विविध सण आणि उत्सव यांच्या पार्श्वभूमीवर अचानक उद्भवणारी परिस्थिती हाताळून जमावाला काबूत आणून कायदा व सुव्यस्था हाताळण्यासाठी पोलिसांच्याकडून त्यांची शस्त्रसज्जतेसाठी आणि असामाजिक घटकांवर काबू मिळविण्यासाठी पोलिसांनी केलेला हा सराव होता. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये.
> – स्वप्नील उणवने,पोलिस निरीक्षक, पो. स्टे. केज

ही कारवाई सुरू असताना प्रत्यक्ष पाहणाऱ्या नागरिकात उलट सुलट चर्चा सुरू झाली. नेमका हा काय प्रकार आहे. याची कुणालाच कल्पना नव्हती. यामुळे प्रत्येकजण माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होता. आणि एक प्रकारचा तणाव आणि दबाव निर्माण झाल्याचे जाणवत असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी यांनी दिली. या सर्व प्रकाराची माहिती पत्रकारांना मिळाल्या नंतर पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता समजले की, शहरात काहीही घडलेले नसून हा पोलिसांचा सराव आहे. अशी माहिती मिळताच सर्वांचा जीव भांड्यात पडला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## चंद्रकांत पाटील यांना बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार मिळाल्याबद्दल

### भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांच्या शुभहस्ते सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

दैनिक समर्थ राजयोग वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट तालुका प्रतिनिधी म्हणुन बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांनी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा फेटा,शाल,श्रीफळ व बुके देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय बीड येथे दैनिक समर्थ राजयोग पत्रकार तथा संपादक स्वाभिमानी न्यूज श्री.चंद्रकांत पाटील,झुंजार नेता पत्रकार श्री.आत्माराम वाव्हाळ,दैनिक लोकमतचे पत्रकार श्री.शिवप्रसाद शिरसट, नमो महासंघाचे प्रदेश अध्यक्ष श्री.भाऊसाहेब घोडके,लेक लाडकी अभियानाचे समन्वयक श्री.बाजीराव ढाकणे, दैनिक आत्ताच एक्सप्रेस पत्रकार श्री. किशोर कुलकर्णी,श्री. दत्ता गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री.शंकर देशमुख यांनी शाल, श्रीफळ देऊन सर्वांचे यथोचित स्वागत केले. शिक्षक दिनाच्या दिवशी श्री.शंकर भाऊ देशमुख यांनी सन्मान केला याबद्दल सर्व मान्यवर यांनी आभार मानले आहेत.

## ४४ राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाची नोटीस

**मुंबई**–महाराष्ट्रातील तब्बल ४४ राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने नोटीस बजावली असून, त्यांच्या नोंदणीवर टांगती तलवार लटकली आहे. वार्षिक लेखापरीक्षण अहवाल, उत्पन्न-खर्च पत्रक, सभासद नोंदणी आणि पत्ता नोंद यासंबंधीची आवश्यक माहिती वेळेत न दिल्यामुळे आयोगाने ही कारवाई केली आहे.आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, नोटीस मिळालेल्या पक्षांमध्ये काही प्रादेशिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील पक्षांचा समावेश आहे. यात आम आदमी पार्टीसह काही लहान-मोठ्या पक्षांचा समावेश असल्याचे वृत्त आहे.

### सुट्टीची सुचना

**अनंत चतुर्दशी निमित्त दैनिक वादळ वार्ता कार्यालयास सुट्टी असल्यामुळे ७ सप्टेंबर वार रविवारचा अंक प्रसारित होणार नाही याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.**

## संपादकीय

# कांद्यांचा वांदा केव्हा मिटणार?

देशात एकूण पिकणाऱ्या कांद्यांपैकी जवळपास ८० टक्के कांदा हा रब्बी हंगामात पिकतो. तर खरिपात पिकणारा ३० टक्के कांदा मधल्या काळात बाजारात कमी पडतो. त्यामुळे नोव्हेंबरपर्यंत दरवर्षी ग्राहकांना कांद्याचा तुटवडा भासतो. परिणामी, शासन यात हस्तक्षेप करते आणि दर नियंत्रणात ठेण्यासाठी विविध मार्गाने कांदा दरावर बंधने आणली जातात. म्हणजेच किमान निर्यात दर जाहीर करणे, हमीभावाने कांदा खरेदी करून खुल्या बाजारात नाफेडमार्फत कांदा विक्री करणे इत्यादी मार्ग अवलंबले जातात.

नाशिक जिल्ह्यात काही महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत कांदा हा मुख्य चर्चेचा विषय होता. याच कांद्यामुळे भाजपचे मोठे नुकसान झाले आहे. लोकसभा निवडणूक निकालाच्या आधी हा प्रश्न मार्गी लागण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा होत आहे. नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर यांनी जिल्ह्यातील 'नाफेड'च्या कांदा खरेदी-विक्री केंद्रांना अचानक दिलेल्या भेटीत कांदा खरेदीत गैरप्रकार होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे नाफेड, एनसीसीएफ अधिकारी आणि व्यापारी यांचे अर्थपूर्ण संबंधदेखील समोर आले आहे. कांद्यांची विनाअट निर्यात करण्यास मुभा दिल्यास कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात काहीतरी पडेल. राज्यामध्ये केंद्र सरकारच्या नाफेड आणि एनसीसीएफ या दोन संस्थांनी शेतकऱ्यांचा कांदा खरेदी करून देखील पैसे न दिल्याने बळीराजा आता हवालदिल झाला आहे. याबाबत चौकशी करण्यास गेले असतानादेखील या दोन्हीही संस्थांचे अधिकारी काहीही उत्तर देण्यास तयार नाही. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात कांदा उत्पादक पैशाअभावी अनंत अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची परिस्थिती आहे. मागील काही दिवसांपासून सतत कांद्यांचा प्रश्न हा गाजत आहे. कधी कांद्यांचे भाव कमी होतात, तर कधी कांद्यांचे भाव वाढत आहे. कांद्यांचे भाव स्थिर राहावे यासाठी म्हणून केंद्र सरकारच्या उपभोक्ता मंत्रालयाने कृषी मंत्रालयाच्या सहकार्यातून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन एजन्सीच्या माध्यमातून कांदा खरेदी करून तो बाजारात कमी भावामध्ये आणण्याचे ठरवले आणि त्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली.देशाच्या एकूण कांदा उत्पादनापैकी नाशिक जिल्ह्यात ९० टक्के उत्पादन व निर्यात केली जात आहे. केंद्र सरकारने यंदा बफर स्टॉकसाठी 'नाफेड', 'एनसीसीएफ'च्या माध्यमातून नाशिकसह धुळे, छत्रपती संभाजीनगर, नगर, पुणे, बीड, धाराशिव, सोलापूर आदी जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या महासंघांना निवेदनाद्वारे कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्यांचा महासंघ व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करणे आवश्यक होते; परंतु संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आधीच स्वस्त दरातील कांदा गोदामात भरून ठेवला होता. पाच लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत तरी कांद्याने वांदा करू नये, यासाठी शासनस्तरावर हालचाली सुरू झाल्या आहे. प्रत्येकी अडीच लाख टन आता 'नाफेड'चे कांदा खरेदीचे दर वाढल्यानंतर हाच स्वस्तातील कांदा 'नाफेड'साठी खरेदी केल्याचे दाखविले आहे. शेतकऱ्यांकडू कांदा खरेदी न करता बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांकडून खळ्यांवरील कांदा खरेदी केला जात होता. याचा अर्थ असा आहे की, शेतकऱ्यांकडून थेट कांदा न घेता, व्यापारी शेतकऱ्यांच्या शेतातून (खळ्यांवरून) स्वस्तात कांदा विकत घेऊन तो नाफेडसारख्या शासकीय यंत्रणांना विकत होते, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाले आहेत. यामुळे सरकारी यंत्रणा खरेदी करत असलेल्या कांद्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.काही दिवसांपासून केंद्राच्या वाणिज्य मंत्र्यांनी आता कांदा भावप्रकरणी हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली आहे. नाफेड जिल्हास्तरावर कांद्यांचा भाव ठरवते. त्याऐवजी आता लोखंड, सिमेंट याप्रमाणेच 'एक देश एक कांदा भाव' असे धोरण केंद्र सरकार लागू करण्याची शक्यता आहे. त्याचे दोन दिवस प्रयोगदेखील झाले. सातत्याने शेतकरी मागील काही दिवसांपासून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन्हीही एजन्सीच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत आहे. या दोन्ही संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर बोगस कांदा खरेदी झाली आहे. अशा स्वरूपाच्या तक्रारीदेखील उपभोक्ता मंत्रालयाकडे करण्यात आलेल्या होत्या. पण त्या दृष्टिकोनातून सुरुवातीला कारवाई झाली नाही, पण याबाबत ज्यावेळी केंद्र सरकारच्याच लक्षात काही गोष्टी आल्यानंतर त्यांनी त्याची चौकशी केली.नाशिकच्या नाफेड व एनसीसीएफमधील अधिकाऱ्यांवरती कारवाईदेखील केली आणि त्यानंतर काही प्रमाणात हा पुरवठा सुरळीत होईल यातून मार्ग निघेल अशी अपेक्षा असतानादेखील ती प्रत्यक्षात खरी होऊ शकली नाही. आता तर किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन नोडल एजन्सीने व शेतकरी कंपन्यांच्या माध्यमातून प्रामुख्याने नाशिक, अहिल्यानगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये ३ लाख टन कांद्याची खरेदी केली. दोन महिने उलटूनही कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना कष्टाचे पैसे मिळालेले नाही. परिणामी, ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना खरेदीदारांचे उंबरे झिजवावे लागत आहे. बफर स्टॉकसाठी खरेदी करण्यात आलेला कांदा सध्या खरेदीदार संस्थांच्या ताब्यात आहे. खरेदीवेळी ७२ तासांत पैसे मिळतील असे सांगण्यात आले. मात्र आता दोन महिने उलटूनही पैसे खात्यावर आले नाही. यामागे कांदा खरेदी व प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याचा ताळमेळ लागत नसल्याने हे पैसे ग्राहक व्यवहार विभाग अदा करत नसल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व व्यवहारामुळे आता कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले असून कांदा विकूनही हातामध्ये पैसा नाही त्यामुळे सण कसा साजरा करावा, नवीन पेरणी कशी करावी यासारख्या विवंचनेत शेतकरी वर्ग आहे. आता 'नाफेड', 'एनसीसीएफ'च्या आर्थिक व्यवहाराप्रश्न चौकशी समिती गठित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे कुंपणच शेत खातेय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आपलेच सरकार धूळफेक करतेय का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यापुढे पारदर्शक कांदा खरेदीसाठी सरकार ठोस, सूक्ष्म आणि जबाबदारी निश्चित करणारे नियोजन करेल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या..

# महाराष्ट्र पुढील शंभर वर्षांसाठी समुद्री क्षेत्रातील महासत्ता बनेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतातील सर्वात मोठ्या कंटेनर टर्मिनलचे उद्घाटन






**मुंबई (वृत्तसंस्था)**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी आज जवाहरलाल नेहरू पोर्ट (जेएनपीए) येथील सिंगापूर बंदर प्राधिकरण (पीएसए) मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) फेज-२ चे हैद्राबाद हाऊस नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. या ऐतिहासिक सोहळ्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जेएन पोर्ट पीएसए मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) फेज-२, उरण जि. रायगड येथे उपस्थित होते. या ऐतिहासिक घटनेमुळे भारतातील सागरी व्यापार पायाभूत सुविधांमध्ये नवीन अध्याय सुरू झाला असून, हे टर्मिनल देशातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणी केंद्र बनले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. त्यांनी महाराष्ट्राला समुद्री क्षेत्रातील महासत्ता बनवण्याचा संकल्प व्यक्त करत, या प्रकल्पाचे यश पंतप्रधान मोदींच्या 'अमृत काल दृष्टिकोन'ला समर्पित केले.या उद्घाटन समारंभाला केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल दूरदृश्य प्रणालीद्वारे, तर खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, पराग शहा, चीफ कमिश्नर कस्टम विनल श्रीवास्तव आणि जेएनपीएचे प्रमुख उन्मेश वाघ यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जेएनपीए आणि पीएसए इंडियाच्या सहकार्यामुळे हे टर्मिनल भारतातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणी केंद्र बनले आहे. वाढवण बंदराच्या कार्यान्वयनामुळे जेएनपीए लवकरच जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. यामुळे महाराष्ट्र पुढील शंभर वर्षांसाठी समुद्री क्षेत्रातील महासत्ता म्हणून उदयास येईल. या प्रसंगी भारत आणि सिंगापूर यांच्यात नवीन करारनाम्यांवर (चेणी) स्वाक्षऱ्या झाल्या, ज्यामुळे द्विपक्षीय सहकार्य आणखी बळकट होईल. या टर्मिनलमुळे महाराष्ट्राने भारतातील बंदर क्षमतेत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले असून, जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.पीएसए इंटरनॅशनलद्वारे चालवले जाणारे हे टर्मिनल १००% अक्षय ऊर्जेवर कार्यरत असून, समर्पित फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) अनुरूप असलेले भारतातील पहिले कंटेनर टर्मिनल आहे. या विस्तारामुळे टर्मिनलची वार्षिक हाताळणी क्षमता ४.८ दशलक्ष टीईयू इतकी झाली असून, घाटाची लांबी २००० मीटरपर्यंत वाढली आहे. यात २४ घाट क्रेन आणि ७२ रबर-टायर्ड गॅन्ट्री क्रेन (आरटीजी) यांचा समावेश आहे.या फेज-२ विस्तारामुळे बीएमसीटीची क्षमता २. ४ दशलक्ष टीईयूपासून दुप्पट होऊन ४.८ दशलक्ष टीईयू झाली आहे. हे टर्मिनल रस्ते आणि रेल्वेद्वारे ६३ हून अधिक इनलँड कंटेनर डेपो (आयसीडी)शी जोडले गेले असून, हे भारतातील सर्वात व्यापक मल्टीमॉडल नेटवर्क आहे. जून २०२५ पासून हे टर्मिनल सुविधांसाठी तयार' होते आणि आजच्या उद्घाटनामुळे राज्यातील लॉजिस्टिक्स आणि व्यापार क्षेत्राला नवीन आयाम मिळणार आहे.उद्योग तज्ञांनी या विस्ताराला 'गेम-चेंजर' म्हटले आहे. अत्याधुनिक उपकरणे आणि बहुआयामी पायाभूत सुविधांसह, पीएसए मुंबई भारताच्या सागरी विकासाचा प्रमुख चालक बनण्यास सज्ज आहे. या उद्घाटनासह भारत जागतिक समुद्री अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावण्यास पुढे सरसावत आहे.यावेळी केंद्रीय राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांनी केंद्र सरकारच्या सागरी विकास धोरणाबाबत सविस्तर माहिती दिली, तर जेएनपीएचे प्रमुख उन्मेश वाघ यांनी टर्मिनलच्या विस्ताराबाबत प्रास्ताविक केले.

# आंदोलनामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार?:हायकोर्टाचा जरांगेंना सवाल



**मुंबई (वृत्तसंस्था)**-मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनामुळे मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना चार आठवड्यांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या नुकसानीची भरपाई कोण देणार? अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना केली. याबाबत चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्रात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले होते. मनोज जरांगे यांच्या एका हाकेवर राज्यभरातील मराठा बांधव मुंबईत दाखल झाले होते. सरकारच्या मध्यस्थीने मंगळवारी मनोज जरांगे यांचे उपोषण संपले. मात्र, या आंदोलनादरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असल्याच्या पार्श्वभूमीवर त्याची भरपाई कोणाकडून करायची, हा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. बुधवारी प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी झाली.उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जरांगे यांनी प्रक्षोभक भाषणे दिल्याने मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत आले आणि त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झाले. परंतु, जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी हे आरोप फेटाळले. त्यांनी सांगितले की, जरांगे यांनी असे कोणतेही भाषण दिले नाही आणि आंदोलकांनी रस्ते किंवा फूटपाथ अडवण्याशिवाय दुसरे कोणतेही नुकसान केले नाही. मात्र, न्यायालयाने काही फोटो दाखवले ज्यात नुकसान झाल्याचे दिसत होते.तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.हे प्रकरण आता निकाली निघाले असले तरी, नुकसानीच्या भरपाईचा मुद्दा बाकी आहे. त्यामुळे, कोणतीही तोंडी माहिती न देता, जरांगे आणि आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपली बाजू मांडावी. यानंतरच याचिका निकाली काढली जाईल, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

# मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात अडचणी येणार नाहीत-एकनाथ शिंदे



**मुंबई (वृत्तसंस्था)**-मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले होते. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर राज्य सरकारने जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने जीआर देखील काढला आहे. परंतु, या जीआरला ओबीसी नेत्यांनी विरोध केला असल्याचे दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या जीआरच्या निषेधार्थ आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला होता. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर आपल्या सरकारने काढला आहे. याबद्दल सविस्तर मी बोललो आहे तसेच मुख्यमंत्री सुद्धा बोलले आहेत. यामध्ये जो निर्णय आम्ही घेतला आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतला आहे. त्यामुळे जी काही पद्धत आहे मराठा समाजातल्या कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती अधिक सोपी करणे सुलभ करणे याचा उल्लेख जीआरमध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे मला असे वाटते की त्याची अंमलबजावणी करण्यात कुठलीही अडचण येणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळेल.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे करत असताना ओबीसी समाजाचे कुठलेही नुकसान होणार नाही, अशी भूमिका सरकारची सुरुवातीपासून आहे. छगन भुजबळ यांच्याशी आम्ही बोलू, मुख्यमंत्री देखील बोलतील आणि जो काही निर्णय घेण्यात आला आहे, त्याची जी काही वस्तुस्थिती आहे त्यांना समजाऊन सांगू. मला वाटते आपण जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती आणि वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर भुजबळ साहेबांची नाराजी दूर होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जीआरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.तसेच मला वाटत आहे की काही लोक म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

# भारताच्या भविष्यासाठी खेळाधारित शिक्षण

आपल्याला विकसित भारत घडवायचा असेल, तर जिथून जीवनाची सुरुवात होते तिथूनच आरंभ करायला हवा. आपल्या सर्वात तरुण नागरिकांच्या क्षमतेचे संगोपन करून, अंगणवाडी केंद्रांमधील बालकांच्या निरागस हास्यामधून, त्यांच्या बडबडगीतांमधून आणि ते तयार करत असलेल्या खेळण्यांच्या ब्लॉक्समधून आपल्या राष्ट्राच्या भविष्याचे वचन पूर्ण होते.

आजच्या भारतात खेळ केवळ वेळ घालवण्याचे साधन राहिलेले नाही, तर ते आहे एक धोरण आणि त्याचे परिणाम स्वतःच बोलके आहेत. गेल्या दशकात, मोदी सरकारने बालविकासाच्या दृष्टिकोनात मूलभूत पातळीवर पुनर्रचना केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा क्षण, ज्यावेळी मेंदूचा ८५ % पर्यंतचा विकास सहा वर्षांच्या वयाच्या आधी होतो हे मान्य करण्यात आले तो होय. जर आपल्याला अधिक कुशाग्र, सुदृढ आणि अधिक निर्माणक्षम लोकसंख्या हवी असेल तर आपल्याला तिथेच गुंतवणूक करायला हवी, जिथे तिची अत्याधिक आवश्यकता आहे. आयुष्याच्या पहिल्या सहा वर्षांमध्ये. वैज्ञानिक पुरावेदेखील याचे समर्थन करत आहे. सीएमसी वेल्लोर येथील क्लिनिकल एपिडेमियोलॉजी विभागाने केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे, की ज्या मुलांना १८ ते २४ महिन्यांच्या संरचित बालपणाच्या काळात योग्य देखभाल आणि शिक्षण मिळाले त्यांच्या बुद्ध्यांकामध्ये लक्षणीय आणि कायमस्वरूपी वाढ दिसून आली. पाच वर्षांच्या वयापर्यंत १९ गुणांपर्यंत आणि नऊ वर्षांच्या वयापर्यंत ५ ते ९ गुणांपर्यंत. विकसनशील भारतासाठी हे फायदे खूप महत्त्वाचे आहेत. भारताचे हे निष्कर्ष जागतिक संशोधनाशी सुसंगत आहेत. जी बालके पाच वयोवर्षाच्या आत दर्जेदार प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमात सहभागी होतात, त्यांचा बुद्ध्यांक अधिक असण्याची शक्यता ६७% जास्त असते, त्यांच्यात उत्तम सामाजिक कौशल्य आणि सुधारित शैक्षणिक कामगिरी दिसून येते असे आंतरराष्ट्रीय अभ्यासातून दिसून आले आहे. या संदर्भात नोबेल पारितोषिक विजेते डॉ. जेम्स हेकमन यांचे प्रसिद्ध वाक्य, 'जितके लवकर तितके चांगले-आणि तितके त्याचे परिणाम बुद्धिमान.' त्यांच्या संशोधनातून असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, की बालपणातील गुंतवणूक १३-१८ % परतावा देते, म्हणजे शिक्षण किंवा नोकरीतील प्रशिक्षणाच्या इतर कोणत्याही टप्प्यापेक्षा जास्त. प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमाचे आर्थिक आणि सामाजिक महत्त्व ओळखून महिला आणि बालविकास मंत्रालयाने 'पोषण भी पढाई भी' हे अभियान सुरू केले आहे, जे आहे अंगणवाडी केंद्रांना चैतन्यशील शिक्षण केंद्रात रूपांतरित करण्याचे अभियान. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पहिल्यांदाच प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले आहे, ज्यामध्ये स्थानिक आणि देशांतर्गत साहित्यसामग्रीचा अवलंब करून कृती आधारित आणि खेळ केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात येत आहे. अध्यापन-ज्ञानार्जनासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूदीतही लक्षणीय वाढ करण्यात आली आणि मासिक दिवस निश्चित करण्यात आले आहे. आज अंगणवाडी केंद्र हे केवळ पोषणाचे ठिकाण नसून ते प्रत्येक बालकाचे पहिले विद्यालय आहे, जिथे मुलांच्या बालपणातील अत्यंत महत्त्वाच्या काळात जिज्ञासा, सर्जनशीलता आणि सर्वांगीण विकासाचे पोषण करते.या परिवर्तनाच्या प्रक्रियेला मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयाने ३-६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी आधारशिला या नावाने प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम तयार केला आहे. आधारशिला अंतर्गत बालकांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले जाते. यामध्ये केवळ बौद्धिक विकासावर नव्हे, तर भावनिक, शारीरिक आणि सामाजिक क्षम कल्याणावर देखील भर दिला जातो. या अंतर्गत संरचित खेळांवर आधारित शिक्षणाचा दृष्टिकोन अंगीकारून मुलांना पोषक वातावरणात प्रगतीचे द्वार खुले केले जाते. मुले स्वाभाविकरित्या खेळाकडे आकर्षित होतात. योग्य वातावरणाच्या साथीने हाच अंतर्भूत घटक आयुष्यभराच्या शिक्षणाचा पाया बनतो. 'पोषण भी पढाई भी' हे अभियान सुरक्षित, संरचित आणि उत्साही वातावरण प्रदान करुन या अनुभूतीला समृद्ध करते जिथे मुले मार्गदर्शित खेळ आणि शिक्षणाद्वारे विकसित होऊ शकतात. पोषण भी पढाई भी अभियानाअंतर्गत देशभरातील अंगणवाडी केंद्रे प्रारंभिक शिक्षणासाठीची पोषक केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. संरचित आधारशिला ५+१ साप्ताहिक योजना सुनिश्चित करते यामध्ये अंगणवाडीतील दिवस ३० मिनिटांच्या खुल्या वातावरणातील खेळाने सुरु होतो, त्यानंतर भाषाविषयक तसेच मुलांमधील सर्जनशीलता वाढवणारे खेळ, गतीप्रेरक कौशल्ये आणि संवाद कौशल्य यांसारख्या विशिष्ट कृती मुलांकडून करून घेतल्या जातात. त्यानंतर पोषक आहार आणि विश्रांती झाल्यानंतर दिवसाचा समारोप मैदानी खेळ तसेच मूल्यात्मक आणि भावनिक बंध दृढ करणाऱ्या संभाषणाने होतो.संरचित आणि असंरचित खेळांचा अंतर्भाव केलेला हा संतुलित दृष्टिकोन महत्त्वाचा असून विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० ने औपचारिक शालेय प्रवेशाची वयोमर्यादा सहा वर्षे इतकी निश्चित केल्याने त्याचे महत्त्व अधोरेखित होते. संरचित प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमामुळे बालके भावनिक, सामाजिक आणि आकलनाच्या पातळीवर शाळेत प्रवेश करण्यास सज्ज असल्याचे सुनिश्चित केले जाते. सर्वात उत्साहजनक गोष्ट ही आहे, की देशभरातील पालकांचा यावरील विश्वास वृद्धिंगत होतो आहे. जी कुटुंबे एके काळी अंगणवाडी केंद्राना केवळ पोषण केंद्र म्हणून पाहत असत ते आता त्यांच्या पाल्याच्या शैक्षणिक प्रवासातील पहिली पायरी म्हणून त्याकडे पाहत आहे. भारतातील प्रत्येक बालकाला एक मजबूत सुरुवात मिळाली पाहिजे. याचे महत्त्व ओळखून महिला बालविकास मंत्रालयाने लहान मुलांच्या प्रारंभिक प्रोत्सहनासाठी नवे चेतना हा राष्ट्रीय आराखडा सादर केला. हा उपक्रम पालक आणि पालनकर्त्यांना सोप्या, खेळांवर आधारित आणि मुलांच्या वयाप्रमाणे कृतींच्या आधारे लहानग्या मनांना घरातच समृद्ध करण्यासाठी सक्षम करतो. माता- पित्यांचा सहभाग हा बालकांच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. एकीकडे उच्च उत्पन्न गटातील पालक आपल्या मुलांसाठी खेळणी आणि पुस्तके खरेदी करण्यात गुंतवणूक करू शकतात; परंतु अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी समान संधी उपलब्ध करून देणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. नवचेतना आणि 'पोषण भी पढाई भी' या अभियानाच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे, जेणेकरून भारतातील प्रत्येक कानाकोपऱ्यातील मुलाला सुरुवातीपासूनच वाढीसाठी आवश्यक असलेले प्रोत्साहन, देखभाल आणि संगोपन मिळेल याची खात्री होईल. भारताला खऱ्या अर्थाने विकसित व्हायचे असेल तर आपल्या सर्वात तरुण पिढीला आयुष्याच्या आरंभीच योग्य सुरुवात मिळणे आवश्यक आहे. खेळ ही काही आरामदायी गोष्ट नव्हे, तर तो शिक्षणाचा पाया आहे. भारतातील प्रत्येक मुलाला शिक्षण, विकास आणि समृद्ध होण्याची संधी मिळेल याची खात्री करण्यासाठी महिला आणि बालविकास मंत्रालय वचनबद्ध आहे, कारण राष्ट्रउभारणीची सुरुवात आपल्या सर्वात तरुण नागरिकांच्या संगोपनापासून होते.

# मेव्हण्यानेच केला अल्पवयीन मेव्हणीचा विनयभंग : दोघा विरुद्ध गुन्हा दाखल

**केज । गौतम बचुटे**

अल्पवयीन मुलगी घरात एकटीच झोपलेली असताना तिच्या मोठ्या बहिणीचा नवरा रात्री गुपचूप घरात शिरून मेव्हण्यानेच अल्पवयीन मेव्हणीचा विनयभंग करून तिला गळा दाबून जीवे मारण्याची धमकी दिल्याची चीड निर्माण करणारी खळबळजनक घटना घडली आहे. दि. २ सप्टेंबर रोजी रात्री त्या विवाहितेची आठवीत शिकत असलेली १४ वर्ष वयाची अल्पवयीन बहीण ही तिचे आई-वडील व भाऊ हे घराच्या दारात अंगणात झोपले असल्याने घराचे दार उघडे ठेवून घरात झोपलेली होती. दरम्यान रात्री सर्वजण झोपलेले असताना रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास त्या अल्पवयीन मुलीच्या मोठ्या बहिणीचा नवरा घरात शिरला आणि त्याने तिचा विनयभंग केला. तिने विरोध केला आणि आरडा ओरड करण्याचे म्हणताच त्याने गळा दाबून जीवे मारण्याची धमकी देवून घरातून पसार झाला.

पीडित अल्पवयीन मुलीच्या आईच्या तक्रारी वरून मेव्हण्या विरुद्ध आणि त्याच्या आई विरुद्ध गु. र. नं. ४८०/२०२५ भा. न्या. सं. ७४, ७५, ३५१(२), ३५२, ३(५)यासह पोक्सोचे कलम ८ आणि १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

**अशी फुटली अत्याचाराची वाचा :-** अल्पवयीन मुलगी ही सकाळी उठल्या नंतर रडत होती. म्हणून तिला रडण्याचे कारण विचारले असता तिने रात्री तिच्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती आईला दिली.

**_पती- पत्नीत दुरावा :-** अल्पवयीन मुलीची मोठी बहिणीचे लग्न एक वर्षा पूर्वी झालेले आहे, परंतु त्या दोघा पती-पत्नीत मतभेद झाल्याने तिची बहीण ही मागील नऊ महिन्या पासून आई-वडिलांकडे माहेरी रहात आहे. त्याच तिच्या बहिणीच्या नवऱ्याने म्हणजे मेव्हण्याने तिचा विनयभंग केला आहे.

**_तो मी नव्हेच ! असा आव आणला :-** या झालेल्या घटने संदर्भात अल्पवयीन मुलीने तिच्या आई वडिलांना माहिती दिल्या नंतर आई वडील जावयाच्या घरी गेले आणि त्यांनी जाब विचारला असता त्याने तो मी नव्हेच अशी भूमिका घेतली आणि तुम्ही माझ्या मुलावर आरोप करीत आहात असे म्हणून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

**दारात झोपलेल्या नातेवाईकांना जाग कशी आली नाही ? :-** अत्याचार प्रकरणातील घटनेची वेळ ही रात्री १०:३० वाजेची असून शेजारच्या गावात राहत असलेला जावई घरात गेला आणि त्याने अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून बाहेर जात असताना मुलीच्या आई-वडिल किंवा कुटुंबातील इतरांना जाग आली नाही किंवा चाहूल सुद्धा कशी लागली नाही ?

# घरफोडी करणारी महिला २४ लाखांच्या मुद्देमालासह मुंब्रा पोलिसांकडून अटकेत

## ३५ तोळे सोन्याचे दागिने व २० हजार रूपये रोख रक्कम हस्तगत

**ठाणे । प्रतिनिधी**

घरफोडी करणारी महिला २४ लाखांच्या मुद्देमालासह मुंब्रा पोलिसांना अटक करण्यात यश आले आहे. सविस्तर माहितीनुसार दिनांक १५/०८/२०२५ रोजी महिला नामे श्रीमती हिना सज्जाद अली सुर्वे, वय ४६ वर्षे, धंदा-गृहीणी रा.ठि. नुर मेहल वि विंग, फ्लट नं २०३, बिलाल हॉस्पीटल समोर, मुंब्रा, ता. जि. ठाणे हे त्याच्या राहत्या घरातून त्यांची आई राहात असलेल्या अरफात बिल्डींग, तन्वरनगर मुंब्रा ठाणे या ठिकाणी मुंब्रा येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या राहत्या दरवाजाची कुलूपाची डुब्लीकेट चावी बनवून सुमारे ३५ तोळे सोन्याचे दागिने व २० हजार रू. रोख रक्कम असा एकुण २४,४२,०००/- मुद्देमाल चोरी करून नेल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून मुंब्रा पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.




गुन्हयाचा प्रकार पाहत, सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहुन यातील अज्ञात आरोपी निष्पन्न करुन गेला मुददेमाल हस्तगत करणेकामी, सदर गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि / विनायक माने यांचेकडे देण्यात आला. गुन्हयातील फिर्यादी यांच्या घराचे दरवाजाचे कुलूप, दरवाजा, कडी कोयंडा, खिडकी असे कोणत्या प्रकारची तोडफोड झालेली नसतांना फिर्यादी यांच्या राहात्या घरातील बेडरूममधील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी झाल्याचे निष्पन्न झाल्याने, फिर्यादी यांच्या आजुबाजूच्या नातेवाईकांकडे व इतर फिर्यादीच्या संपर्कात असलेल्या कोणीतरी व्यक्तीने गुन्हा केला असावा असे संशय असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने मा. सहा. पोलीस आयुक्त, कळवा विभाग व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा पो.स्टे यांचे मार्गदर्शनाखाली सी.सी.टी.व्ही फुटेज या तांत्रीक तपासाचे आधारे, मोबाईल फोन व गोपनीय बातमीदार याच्याकरवी तपास पथकातील अधिकारी सपोनि/ विनायक माने व तपास पथकातील अंमलदार व महिला अंमलदार यांचे समक्ष फिर्यादी यांच्या नातेवाईकांची कसुन चौकशी केली असता, सर्वतोपरी केलेल्या तपासात संशयीत महिला नामे सानिया सारीक बेग, वय २९ वर्षे, धंदा-गृहीणी, रा.ठि. मिडलॅन्ड इन्क्लेव्ह बिल्डींग, रूम नं ६०५, सहावा माळा, कमल मेडीकल जवळ, सेक्टर १०, फेज-१, तळोजा नवी मुंबई यांच्याकडे गुन्हयावे अनुषंगाने अधिक तपास केला असता, त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने गुन्हा दाखल झाल्यानंतर ०८ तासाच्या आत महिला आरोपीस अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे. महिला आरोपी अटकेत असतांना निवेदन पंचनाम्याप्रमाणे ३५ तोळे सोने व २० हजार रू. रोख रक्कम हस्तगत केला आहे. सदर कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त ( पश्चिम प्रादेशिक विभाग) श्री विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त श्री सुभाष बुरसे, तसेच सहा. पोलिस आयुक्त श्रीमती प्रिया डमाळे, तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री अनिल शिंदे व पोलीस टीम यांनी यशस्विरित्या पार पाडली.

# ठाणे पालिकेच्या प्रभाग रचनेवर सेव्ह दिवा फाउंडेशनची हरकत




**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या मसुदा वार्ड रचनेवर आज सेव्ह दिवा फाउंडेशनने जोरदार हरकत नोंदवली आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष ऍड रोहिदास मुंडे यांनी आज शेवटच्या दिवशी आयुक्तांना सविस्तर निवेदन देऊन प्रभाग क्र. २७, २८, २९ व ३० मधील अन्यायकारक विभागणी विरोधात तीव्र आक्षेप नोंदवले.ऍड. मुंडे यांनी स्पष्ट केले की, प्रभाग क्र. २९ मध्ये २७ व २८ मधील भागांचा जबरदस्ती समावेश करण्यात आला आहे. यामुळे भौगोलिक सलगता तुटली असून लोकसंख्या असमतोल निर्माण झाला आहे. परिणामी प्रभाग क्र. ३० वर १५-१८% अतिरिक्त लोकसंख्येचा भार पडला आहे. ही विभागणी पूर्णपणे कायदेशीर निकषांच्या विरोधात असून जनतेच्या न्याय्य प्रतिनिधित्वावर सरळ आघात आहे, असे मुंडे यांनी ठामपणे सांगितले.फाउंडेशनच्या निवेदनात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५(३), कलम ६ व ७- तसेच भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ आणि अनुच्छेद २४३ढ यांचा भंग झाल्याचे नमूद केले आहे. याशिवाय राज्य निवडणूक आयोगाच्या २९ डिसेंबर २०२१ च्या आदेशानुसार औ१०% लोकसंख्या मर्यादा पाळली गेली नाही, असा ठोस पुराव्यानिशी दावा करण्यात आला आहे. एक मत = एक मूल्य या लोकशाही तत्त्वावर गदा येऊ देणार नाही. ठाण्याच्या नागरिकांच्या हक्कांसाठी आम्ही लढा देऊ. जर रचना दुरुस्त झाली नाही तर आम्ही न्यायालयापर्यंत जाण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा ॲड. रोहिदास मुंडे यांनी दिला. फाउंडेशनने ठाम मागणी केली आहे की प्रभाग क्र. २७ व २८ मधून काढलेले भाग मूळ प्रभागात परत द्यावेत आणि प्रभाग क्र. २९ हा पूर्ववत ठेवून कौसा पर्यंत जोडावा, ज्यामुळे सर्व प्रभागांमध्ये न्याय्य संतुलन निर्माण होईल.

# इनोव्हा गाडी चोरणाऱ्यांना राजस्थानमधून अटक

## कर्जत पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत येथून इनोव्हा गाडी चोरून नेणाऱ्या चोरट्यांना कर्जत पोलिसांनी राजस्थानमधून अटक केली आहे. कर्जत पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,कर्जत येथील सद्दाम अश्फाक मिस्त्री यांचे दहीवली येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात स्पेअर पार्ट शोरुम आहे. त्यांनी त्यांच्या शोरुमच्या शेजारी टोयाटो कंपनीची पांढऱ्या रंगाची इनाव्हा गाडी उभी करून ठेवली होती. ती गाडी २१ ऑगस्ट रोजी चोरट्यांनी चोरून नेली होती. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, कर्जतचे उप विभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड, पोलीस निरीक्षक संदिप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहूल वरोटे, सुशांत वरक आणि कर्जतचे गुन्हे प्रगटीकरण पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरु केला. या पथकाला तांत्रिक तपासाच्या मदतीने चोरट्यांबाबत खात्रीशिर माहिती उपलब्ध झाली. त्या माहितीच्या आधारे तपास पथक वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने राजस्थान येथे रवाना केले.तपास पथकाने राजस्थान येथील बाडनेर व जालौर जिल्ह्यांमधून या गुन्ह्यातील ओम प्रकाश सवाई राम विश्नोई (३४) व अशोक कुमार ईसराराम बिश्नोई (४७) या दोन आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरी केलेली इनोव्हा गाडी आणि आरोपीतांनी गुन्हा करण्याकरिता वापरलेली एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी जप्त



करण्यात आली. दोन्ही आरोपीत हे अतिशय सराईत आणि कुख्यात आरोपीत असून त्यांच्याविरुध्द राजस्थान राज्यात ३ खूनाचा प्रयत्न याच्यासह एकूण १७ चोरी, फसवणूक, बनावट कागदपत्रं, खंडणी, गंभीर दुखापत, बलात्कार व भारतीय हत्यार कायदा, अंमलीपदार्थ विरोधी कायदा अशा प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.सदर आरोपींना दि. ३ सप्टेंबर रोजी अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यांच्या अन्य गुन्ह्यांबाबतही सखोल तपास सुरू आहे.ही उल्लेखनीय कामगिरी पो.नि. संदिप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. राहुल वरोटे, पोसई सुशांत वरक, पोहवा संतोष खाडे, पोहवा स्वप्नील येरुणकर, पोहवा सागर शेवते व पोकों विठ्ठल घावस,पोना प्रविण भालेराव यांनी केली. . सदर गुन्ह्याचा यशस्वी तपास करुन गुन्हा उघडकीस आणल्याबावत कर्जत पोलीसांचे वरिष्ठांनी अभिनंदन केले आहे.

# मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नाही:मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या,ओबीसीमधून नको-भुजबळ यांची मागणी

**नाशिक (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सोमवारी पत्रकार परिषद घेत त्यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण नको, अशी मागणी केली आहे. तसेच आज पुन्हा एकदा त्यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नसल्याचे म्हटले आहे.छगन भुजबळ म्हणाले, सगळ्या आयोगांनी मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही. हा समाज जो आहे हा आर्थिकदृश्य मागास असेल, शैक्षणिकदृष्ट्या असेल, परंतु हा समाज सामाजिक मागासलेला नाही असे सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने सांगितले आहे.



महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले आहेत ज्यांनी मराठा समाजाला मागास मानेल नाही. सारथीच्या माध्यमातून जे ओबीसीला मिळते ते तर दिलेच, त्यापेक्षा अधिक देणे सुरू आहे. वसतीगृहसाठी फुकट दिले आहे. परंतु, ओबीसीला अजूनही लढावे लागत आहे. त्यांना वर्षाला ६० हजार रुपये दिले जातात. आम्हाला अजूनही मागावे लागत आहे.मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नाही, याचे कारण असे आहे की कालेलकर आयोग जे आहे, १९६० च्या दरम्यान निर्माण झाले होते. त्यांनी मराठा समाजाला पुढारलेला समाज असल्याचे सांगितले होते. त्यानंतर मंडल आयोगाने सांगितले की हा समाज पुढारलेला आहे. त्यानंतर मग मंडल आयोग सगळीकडे लागू झाल्यानंतर १९९३ च्या आधी आयोग ही कल्पना नव्हती. त्यावेळी विधानसभेत निर्णय घेतले जायचे. ९३ साली इंद्रा सहाणी केस जेव्हा झाली तेव्हा निर्णय घेण्यात आला की आयोग स्थापन केले जाईल.मंडल आयोग हा केंद्र सरकारनेच तयार केला असल्याने २७ टक्के आरक्षण ओबीसीला दिले. त्यानंतर महाराष्ट्रात देशमुख आयोग, बापट आयोग, खत्री आयोग आणि गायकवाड आयोग, यातील गायकवाड आयोग सोडल्यास इतर आयोगांनी निर्णय दिले की मराठा समाज हा सामाजिक दृष्ट्या मागास नाही.

# कापसावरील आयात शुल्कमाफी वाढविण्याच्या निर्णय विरोधात किसान सभेचे निदर्शने

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्कमाफीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याच्या घेतलेल्या निर्णयाला विरोध दर्शवून किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर सदर अधिसूचनेच्या प्रतीची होळी करण्यात आली. या निर्णयाने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचा आरोप करुन जोरदार घोषणाबाजी करुन असंतोष व्यक्त करण्यात आला.

बुधवारी (दि.३ सप्टेंबर) झालेल्या या आंदोलनात राज्य उपाध्यक्ष कॉ. बन्सी सातपुते, कॉ.ड. सुधीर टोकेकर, कॉ. बाबा आरगडे, सचिव कॉ. अप्पासाहेब वाबळे, प्रा. सुभाष ठुबे, कॉ. स्मिता पानसरे, प्रा. सुभाष कडलग, कॉ. अनंत लोखंडे, भारत आरगडे, सुलाबाई आदमाने, नारायण मेमाणे, प्रताप सहाणे, दशरथ हासे, सतीश पवार, सुनिल दुधाडे, धोंडीभाऊ सातपुते, मच्छिंद्र आर्ले आदी सहभागी झाले होते.

कापूस उत्पादक पट्ट्यातील शेतकरी जोरदार विरोध करत असतानाही अर्थ मंत्रालयाने शुल्कमाफी वाढवली. या निर्णयामुळे ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या कापूस हंगामात आयात केलेल्या कापसामुळे देशांतर्गत दर घसरतील आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार नाही. गेल्या ११ वर्षांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) ने देशांतर्गत उत्पादनातील केवळ १३ टक्के खरेदी केली असून, ८७ टक्के शेतकरी खुले बाजारात तोट्यात कापूस विकण्यास मजबूर झाले आहेत. मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत असून, औद्योगिक मक्तेदार घराण्यांच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान करत आहे. किसान सभेच्या वतीने हा निर्णय शेतकरी समाजाचा अपमान असल्याचे स्पष्ट करुन देशभरात आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

किसान सभेच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील कापड उद्योगाचा आकार तब्बल १५,१३,८५० कोटी रुपये इतका होता. त्यातील १२,३४,४०० कोटी रुपयांचा हिस्सा देशांतर्गत बाजाराचा होता, तर निर्यात बाजार केवळ ३,२१,९०० कोटी रुपयांचा होता. त्यातही अमेरिकेला जाणारी निर्यात फक्त २०,९८४ कोटी रुपये (१.५% पेक्षा कमी) इतकी आहे.

# जनतेच्या हितासाठी सजग राहावे-माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांचे प्रभावी उद्गार

**आष्टी । प्रतिनिधी**

ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळा, पंचायत समिती आष्टी येथे उत्साहात पार पडली.या वेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जितीन रहेमान यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शासन विविध योजनांमार्फत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देत आहे.त्यामुळे ग्रामपंचायती सक्षम व्हाव्यात, पारदर्शक कामकाजातून गाव विकासाचा वेग वाढावा.लोकसहभाग हेच खरे बळ आहे. असे त्यांनी प्रतिपादन केले.

या विशेष कार्यशाळेत मा.माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना) यांनी प्रभावी भाषणातून जनतेच्या हितासाठी सजग राहण्याचे आवाहन केले. पंचायतराज ही लोकशाहीची पायाभरणी असून,ग्रामपंचायतींनी खऱ्या अर्थाने गावकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करावे.जनता समाधानी झाली तर विकासाची वाट आपोआप सुकर होते. असे त्यांनी ठामपणे सांगितले.कार्यक्रमास मा.गटविकास अधिकारी श्री.गोकुळ बागलाने,विस्तार अधिकारी पंचायत श्री.बाळासाहेब जायभाय, श्री.नागनाथ शिंदे,श्री. अजय निंबाळकर,श्री.नितीन राऊत, स्वच्छ भारत अभियानातील अविनाश टाकणखान,अक्षय पवार,खाडे, लोकशाही पत्रकार संघ बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे,सांगवी पाटण गावचे आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे,पुंडी गावचे उपसरपंच बाळासाहेब थोरवे,यांच्यासह तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख, ग्रामपंचायत सदस्य,कर्मचारी,रोजगार सहाय्यक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेमुळे आष्टी तालुक्यातील ग्रामपंचायतींना विकासाचा नवा दृष्टिकोन मिळाला असून,गावोगावी सक्षम व आदर्श पंचायत व्यवस्थेचा मार्ग मोकळा झाला आहे.



# साळेगावच्या सरपंच आणि उपसरपंचात वगटबाजीची ठिणगी!

## ग्रामपंचायतमध्ये अपहार : उपसरपंचाने केली गटविकास अधिकाऱ्याकडे तक्रार करीत दिला उपोषणाचा इशारा

## उपसरपंचाचा ग्रामविकास अधिकाऱ्या आडून सरपंचावर निशाणा

### उपसरपंच्याच्या पाठीशी संख्याबळ किती ?

साळेगाव ग्रामंचायतीमधे सरपंच कैलास जाधव यांच्या गटाचे सात सदस्य असून त्यांच्या विरोधी गटाचे चार सदस्य आहेत. त्यामुळे आता उपसरपंच गणेश गालफाडे हे सत्ताधारी गटाचे असल्याने त्यांच्या पाठीशी आणखी किती सदस्य त्यांना साथ देतात हे लवकरच समजेल की हे पेल्यातील वादळ पेल्यातच शमते !

माझ्याकडे विडा, देवगाव आणि साळेगाव येथील पदभार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाला मी विडा येथे उपस्थित होतो.
–अरुण पोटभरे,
ग्रामविकास अधिकारी

**केज | गौतम बचुटे**

केज तालुक्यातील साळेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गालफाडे यांनी गटविकास अधिकाऱ्याकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, साळेगाव ग्रामपंचायतीत अपहार झालेला असून ग्रामविकास अधिकारी त्यांना कोणतीही माहिती देत नाहीत. तसेच ते स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाला गैरहजर होते. त्याची चौकशी करण्यात यावी. अन्यथा त्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंच कैलास जाधव यांच्या ताब्यात असून ते सलग दुसऱ्यांदा सरपंच झालेले आहेत. त्यांच्याच गटाचे गणेश गालफाडे हे उपसरपंच आहेत.

मात्र दि. ३ सप्टेंबर रोजी उपसरपंच गणेश गालफाडे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना एक निवेदन दिले आहे. त्यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की, ग्रामविकास अधिकारी अरुण पोटभरे यांनी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट रोजी ची ग्रामसभा घेतलेली नाही.



ग्रामविकास अधिकारी हे स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाला गैरहजर होते. या बाबत त्यांना विचारले असता.ते उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करीत आहेत. तसेच त्यांनी मासिक सभा देखील घेतली नाही. मासिक सभेचे ते प्रोसेडिंग लिहित नाहीत. तसेच जमा आणि विकास निधीचा जमाखर्च याची माहिती उपसरपंचांना देत नाहीत. यामुळे ग्रामपंचायतीमध्ये मोठा अपहार झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या पूर्वी देखील उपसरपंच यांनी दिलेल्या अर्जाची चौकशी झाली नसल्याचे त्यांनी म्हटले असून आठ दिवसात करवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

### ग्रामविकास अधिकाऱ्या आडून सरपंचावर निशाणा

उपसरपंच गणेश गालफाडे यांनी त्यांनी दिलेल्या निवेदनात केलेल्या तक्रारींचा सबंध हा सरपंचाशी येत असून मासिक सभा व ग्रामसभा घेण्याचा आणि बोलावण्याचा अधिकार हा सरपंच यांना आहे आणि सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली या बैठका होत असतात तर ग्रामविकास अधिकारी हे ग्रामंचायतीचे सचिव आणि सल्लागार म्हणून काम पाहात असतात.

### गावात घन कचरा व्यवस्थापन आणि भूमिगत नाल्यांचे काम सुरू

साळेगाव येथे सध्या घनकचरा व्यवस्थापन, गांडुळ खत शेड आणि भूमिगत नाल्यांचे काम सुरू आहे. या कामात सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी त्यांना विश्वासात घेतले नसावे अशी ग्रामस्थात चर्चा आहे.

# श्रीराम गणेश मंडळांचा स्तुत्य उपक्रम आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबिर संपन्न

**नायगाव | हनुमंत चंदनकर**

नायगाव शहरातील कल्याण गल्लीतील नवसाला पावणाऱ्या गणेश मंडळाच्या वतीने आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी आरोग्य तपासणी रक्त तपासणी शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते यात दीडशेहून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली सत्तर वर्षाची अखंड परंपरा असलेला व नवसाला पावणारा गणपती म्हणून या गणेशाची ओळख आहे दररोज पूजा अभिषेक आरती व विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वतीने राबवले जातात ३१ ऑगस्ट रोजी अजिंक्य पाटील कल्याण यांच्यावतीने महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं होतं तर माजी नगराध्यक्षा मीनाताई सुरेशराव कल्याण यांच्यावतीने पाच



सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे श्रीराम गणेश मंडळाचे अध्यक्ष श्री अजिंक्य पाटील कल्याण नायगाव ग्रामीण रुग्णालयाची वैद्यकीय अधिकारी कर्मचारी व कार्यकारी मंडळ शिवम कल्याण किरण धनंजय सचिन कल्याण भागवत मद्देवाड शिवराज स्वामी(महाराज) शिवाजी आईनवाड बालाजी कल्याण गंगाधर मद्देवाड यासह कल्याण गल्लीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी दिली छत्रपती संभाजीनगर ला भेट

**छ. संभाजीनगर | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे राज्यव्यापी अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाजवळ असलेल्या संत एकनाथ नाट्य मंदिर याठिकाणी होत आहे.या राज्यव्यापी अधिवेशनाच्या पूर्व तयारी साठी आज अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर विश्वस्त मा.शरद पाबळे,सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,परिषदेचे राज्य



उपाध्यक्ष मा.गणेश मोकाशी, छत्रपती संभाजीनगर मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष – बालाजी सूर्यवंशी, कार्याध्यक्ष – कानिफ अन्नपूर्णे, सचिव– प्रकाश भगनुरे, उपाध्यक्ष– महादेव जामणीक,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ,डिजिटल मिडिया परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर मुळे व इतर पत्रकार बांधवांनी नियोजीत संत एकनाथ रंग मंदिर, क्रांती चौक येथे भेट देऊन पाहणी केली. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील पदाधिकाऱ्यांना या राज्यव्यापी अधिवेशना बाबत मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी मार्गदर्शनही केले.

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भिक्खु संघाची धम्मध्वज रॅली

## भिक्खु धम्मशिल थेरोंचे उपस्थित राहण्याचे आवाहन

**बीड | प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी काढण्यात आलेली धम्मध्वज रॅली आता बीडमध्ये दाखल होत आहे. नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीपासून सुरुवात झालेली ही रॅली मध्यप्रदेशातील सौंसरपर्यंत मार्गक्रमण करत असून, तिचा ठाणाव मंगळवार (दि. ९ सप्टेंबर) रोजी बीडमध्ये होणार आहे. या संदर्भात शुक्रवार (दि. ५) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात महाबोधी महाविहार मुक्ती जिल्हा समितीची महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत रॅलीच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत भिक्खु धम्मशिल थेरो यांनी





सांगितले की, महाबोधी महाविहार येथेच तथागत गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती. हे स्थळ बौद्धांसाठी जगातील सर्वात पवित्र स्थळ असून, त्याचा ताबा बौद्धांनाच असायला हवा. परंतु सध्या हा ताबा हिंदू ब्राह्मणांकडे आहे. विहाराचा ताबा बौद्धांना मिळावा या मागणीसाठी धम्मध्वज रॅली काढण्यात आली आहे.

भन्ते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली निघाली असून, त्यात भिक्खु संघासह सुमारे शेकडो उपासक-उपासिका सहभागी झाले आहेत. बीडमध्ये या रॅलीचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात येणार असून, बौद्ध अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीकडून करण्यात आले आहे.शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सामाजिक न्याय भवनापर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, शेवटी सभा पार पडणार आहे. या सभेत विविध वक्ते मार्गदर्शन करणार असून, बीड जिल्ह्यातील बौद्ध अनुयायांना या आंदोलनाचे महत्व समजावून सांगितले जाणार आहे. त्यामुळे बौद्ध उपासक उपासिकांनी या रॅलीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भिक्खु धम्मशिल थेरो यांनी सर्व केले आहे.

## औश्यात स्मार्ट मीटर ला तीव्र विरोध

# कंपनीचे कर्मचारी भीती दाखवून बसवु लागले स्मार्ट मीटर

**लातुर | नदीमुल्ला पटेल**

तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कंपनीची कर्मचारी सर्वत्र फिरून स्मार्ट मीटर बसवत आहेत अनेक ठिकाणी या कर्मचाऱ्यांना विरोध दर्शवला जात आहे. तरीही हे कर्मचारी ग्राहकांना दंड लागेल अशी भीती दाखवून स्मार्ट मीटर बसवण्यासंदर्भात ग्राहकास भीती दाखवत आहेत. या भीतीपोटी अनेकांनी स्मार्ट मीटर बसवले आहे.ग्राहकाच्या संमतीविना स्मार्ट मीटर बसवता येत नाही. तरीही कर्मचारी जबरदस्तीने अनेक ठिकाणी स्मार्ट मीटर बसवत असल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे. स्मार्ट मीटर संदर्भात सद्यस्थितीत ग्राहकात भीतीचे वातावरण आहे. अनेक जण या मीटर मध्ये बिल जास्त येत असल्याची चर्चा करत आहेत.




याबाबतीत ग्राहकांशी विचारपूस केली त्यावेळी त्यांनी आम्हाला हे मीटर बसवायचे नाहीत असे स्पष्टपणे सांगितले. माझे विद्यमान मीटर व्यवस्थित आहे मला या मीटर संदर्भात कसलीही तक्रार नाही तरीही कंपनीचे लोक स्मार्ट मीटर बसवण्यासंदर्भात जबरदस्ती करत आहेत हे चुकीचे आहे अतिक बागवान.बरकत नगर औसा शहरात सध्या या मीटर संदर्भात उलट सुलट चर्चा असली तरी या मीटरचा अनेकांनी विरोध दर्शवल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे.

# खा.प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत कोरपना येथे विकासकामांचा आढावा; अनेक ज्वलंत प्रश्नांवर चर्चा

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

कोरपना येथील तहसील कार्यालयात आज खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध ज्वलंत प्रश्नांवर एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. माजी आमदार सुभाष धोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत स्थानिक नेते आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व मुद्द्यांवर सखोल चर्चा करून त्यांच्या निराकरणासाठी तातडीने उपाययोजना करण्याचा सूचना करण्यात आल्या.जिल्ह्यात सध्या खताची तीव्र टंचाई असून, विशेषतः युरिया उपलब्ध नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देण्यात आली. ऑनलाईन अर्जांमध्ये कागदपत्रांच्या साईजची मर्यादा असल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण होत असून, कृषी सहायकांनी यावर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. विकासकामांच्या स्थितीवरही सकारात्मक चर्चा झाली. पॉवर हाऊस ते नंदाफाटा पर्यंतचे काम अद्याप अपूर्ण असून, कोरपना तालुक्यातील रस्त्यांचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. घरकुल धारकांना जवळच्या घाटातून रेती उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच, अनेक अपूर्ण बांधकामे



तात्काळ पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.याशिवाय, बँक ऑफ इंडियामध्ये कर्मचाऱ्यांचा अभाव असल्यामुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.या सर्व समस्यांवर बोलताना खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. या सर्व समस्यांवर तात्काळ उपाययोजना करून कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.या बैठकीला माजी आमदार सुभाष धोटे, उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, तहसीलदार पल्लवी आखरे, विस्तार अधिकारी पाल, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक विजय बावणे, काँग्रेस तालुका अध्यक्ष उत्तम पेचे, पोलीस निरीक्षक कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता अडपेवार, काँग्रेस नेते सुरज ठाकरे, नितीन बावणे, आशिष देरकर, शैलेश लोखंडे, अशोक बावणे, आणि संतोष महाडोळे यांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077